Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १६८ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

माळेगाव शिवारात रानडुकरांचा धुमाकूळ; अडीच एकर मका पिकाचे नुकसान (पान २ वर)



Selected

आयआयटीत SC, OBC प्राध्यापकांची कमतरता

मुंबई : विशेष भरती मोहीम राबवूनही आयआयटी मुंबईमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय प्राध्यापकांचे प्रतिनिधित्व अजूनही खूप कमी असल्याची माहिती समोर आली आहे. 'हिंदुस्तान टाइम्स'ने मिळवलेल्या माहिती अधिकाराच्या आकडेवारीनुसार, या वर्षी सप्टेंबरपर्यंत संस्थेतील ४१२ प्राध्यापकांपैकी केवळ ५ अनुसूचित जातीचे आणि ६ इतर मागासवर्गीय आहेत. प्राध्यापक पदावर अनुसूचित जमातीचा एकही व्यक्ती नाही. असोसिएट आणि असिस्टंट प्रोफेसर पातळीवर संस्थेत एकूण ३६३ प्राध्यापक कार्यरत आहेत. यामध्ये २९ अनुसूचित जातीचे, ८ अनुसूचित जमातीचे तर ३५ ओबीसी समुदायाचे आहेत. या माहिती अधिकारानुसार, आयआयटी मुंबईमध्ये एकूण १ हजार २२५ मंजूर अध्यापन पदे आहेत, ज्यातील ४५० पदे अद्याप रिक्त आहेत.

पुणे, नाशिक, ठाण्यात 'टेबल सर्व्हे' झाल्याचा आरोप

SIRनंतर महाराष्ट्रातील मतदार वगळण्याचा आकडा तीन कोटींपर्यंत?

२.०७ कोटींच्या आकड्यात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याचा रोहित पवारांचा दावा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला (SIR) सध्या राजकीय वर्तुळात वेगळीच धार आली असून, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मतदार यादीतील संभाव्य वगळण्याबाबत मोठा दावा केला आहे. सध्या २.०७ कोटी मतदारांच्या गणना अर्जांची नोंद न झाल्याचे समोर आले असून, तपासणीच्या कक्षेत असलेल्या आणखी १.२२ कोटी मतदारांपैकी काहींची नावे वगळली गेल्यास हा आकडा सुमारे तीन कोटींपर्यंत पोहोचू शकतो, असा दावा पवार यांनी केला आहे.

मात्र, २.०७ कोटी मतदारांची नावे अंतिमतः मतदार यादीतून हटविण्यात आली आहेत, असा अर्थ या आकड्याचा होत नाही. निवडणूक प्रक्रियेदरम्यान गणना अर्ज न मिळालेल्या मतदारांची ही संख्या असून, मृत्यू, कायमस्वरूपी स्थलांतर, मतदाराचा पत्ता सापडला नाही किंवा दुबार नोंद अशा विविध कारणांचा अधिकाऱ्यांकडून उल्लेख करण्यात आला आहे.

'१.२२ कोटी मतदारांची प्रकरणे तपासणीखाली'

रोहित पवार यांच्या म्हणण्यानुसार, १.२२ कोटी मतदारांच्या नोंदी अद्याप तपासणीच्या प्रक्रियेत आहेत. त्यातील काही मतदार अपात्र ठरल्यास वगळण्याचा आकडा आणखी वाढू शकतो, असा त्यांचा दावा आहे. त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित करत निवडणूक प्रक्रियेतील निर्णयप्रक्रिया अधिक केंद्रीकृत झाल्याचा आरोप केला.



पवार यांनी काही भागांमध्ये बूथ-स्तरीय अधिकाऱ्यांनी (BLO) प्रत्यक्ष घरभेटी घेऊन पडताळणी करण्याऐवजी 'टेबल सर्व्हे' केल्याचा आरोप केला. पुणे, नाशिक आणि ठाणे येथे अशा प्रकारच्या तक्रारी समोर आल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, काही प्रकरणांमध्ये माहिती भाजप कार्यकर्त्यांकडून पुरविल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या आरोपांबाबत संबंधितांकडून स्वतंत्र स्पष्टीकरण किंवा निष्कर्षाची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

मतदार नोंदीतील त्रुटींवरही सवाल

SIR प्रक्रियेनंतरही मतदार नोंदींमध्ये त्रुटी कायम असल्याचा दावा पवार यांनी केला. काही जिवंत व्यक्तींना मृत दाखविणे, तर काही मतदारांच्या छायाचित्र आणि लिंगाच्या तपशीलांमध्ये विसंगती असल्याचे उदाहरण त्यांनी दिले. अशा त्रुटींमुळे पात्र मतदारांचा मतदानाचा अधिकार प्रभावित होऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, महाराष्ट्रातील SIR प्रक्रियेत दावे, हरकती आणि सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच १.२२ कोटी मतदारांना बजावण्यात येणाऱ्या नोटिसांच्या कार्यवाहीची मुदतही १० नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे अंतिम मतदार यादीपूर्वी संबंधित मतदारांना आपली बाजू मांडण्याची संधी उपलब्ध आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने जानेवारी २०२६ मध्ये ECINET हे एकत्रित डिजिटल व्यासपीठ सुरू केले असून, निवडणूक प्रक्रियेशी संबंधित ४० हून अधिक विद्यमान ॲप्स व पोर्टल्स एका प्लॅटफॉर्मवर आणण्यात आले आहेत. मतदार नोंदणी, मतदार यादीतील नाव शोधणे, तक्रारी आणि निवडणूकविषयक विविध सेवा या माध्यमातून उपलब्ध आहेत.SIRच्या अंतिम प्रक्रियेत नेमकी किती नावे वगळली जातात आणि किती मतदार दावे-हरकतीनंतर पुन्हा यादीत समाविष्ट होतात, हे अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

SIR आणि मतदारसंघ पुनर्रचनेवर चिंता

SIR आणि आगामी मतदारसंघ पुनर्रचनेच्या प्रक्रियेमुळे संविधान, मतदानाचा अधिकार आणि आरक्षणाच्या प्रश्नांवर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता रोहित पवार यांनी व्यक्त केली. विरोधी पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी एकत्र येऊन मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणासाठी आवाज उठवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

देशभरातील बँक कर्मचाऱ्यांचा संप मागे, रात्री उशीरा कर्मचारी संघटनांची

जन सम्राट टाईम्स

पुणे प्रतिनिधी: गणेशोत्सवातील गर्दी आणि शहबँकांचे व्यवहार करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. देशभरातील बँकांचे कर्मचारी उद्या, 28 सप्टेंबरपासून संपावर जाणार होते. मात्र, हा तीन दिवसांचा संप स्थगित करण्यात आला आहे. संपाच्या केवळ एक दिवस आधी, आयबीए (IBA) आणि बँक कामगार संघटनांची संघटना, यूएफबीयू (UFBU), यांनी रात्री उशिरा एक बैठक घेतली. या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली आणि काही निर्णय घेण्यात आले आहेत. संप स्थगित करण्यात आला आहे. संपाच्या केवळ एक दिवस आधी, आयबीए (IBA) आणि बँक कामगार संघटनांची संघटना, यूएफबीयू (UFBU), यांनी रात्री उशिरा एक बैठक घेतली. या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली आणि काही निर्णय घेण्यात आले आहेत. संप स्थगित करण्यात आला आहे. दरम्यान, उद्यापासून म्हणजे 28 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर 2026 या तीन दिवसांसाठी देशव्यापी बँक संपाचे आयोजन करण्यात आले होते. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने या संपाची घोषणा केली होती. मात्र, आज रात्री उशीरा बँक कर्मचारी संघटनांची बैठक झाली. या बैठकीत उद्यापासून होणारा तीन दिवसांचा संप स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, नेमका तोडगा निघाला की नाही? याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही. सलग पाच दिवस बँका बंद राहू नये, ग्राहकांना संपाचा फटका बसू नये यासाठी रविवारी देखील बँका सुरु ठेवण्यात आल्या होत्या. सप्टेंबरमधील चौथ्या शनिवार मुळं बँका काल बंद होत्या. ग्राहकांची गैरसोय होऊ नये यासाठी रविवारी बँकाचं कामकाज सुरु ठेवण्यात आलं होतं. आता उद्यापासून सलग तीन दिवस बँका बंद राहणार असल्यानं चेक क्लिअरन्स, बँक खात्यातून रोख रक्कम काढणे आणि जमा करणे यासह इतर बँकिंग सेवा प्रभावित होऊ शकतात. बँक कर्मचारी यूनियनच्या संपाचा परिणाम सार्वजनिक बँका, जुन्या



खासगी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांमध्ये पाहायला मिळू शकतो. संपावर जाणाऱ्या बँक कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी म्हणजे पाच दिवसांचा कामाचा आठवडा ही आहे. यूनियनच्या नेत्यांच्या माहितीनुसार मुख्य श्रम आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेत सरकारकडून पाच दिवसांचा कामाचा आठवडा लागू करण्यावर ठोस आश्वासन दिलं नाही. एआयबीओसीचे महासचिव रुपम रॉय यांनी सरकार आणि व्यवस्थापनाच्या आडमुठ्या धोरणामुळं यूनियनला आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यास भाग पडलं, असं म्हटलं. काही सरकारी आणि वित्तीय संस्थांमध्ये पाच दिवसांच्या कामाच्या आठवड्याची पद्धत लागू आहे. एनसीबीईचे महासचिव एल चंद्रशेखर यांनी देखील केंद्र आणि राज्य सरकारची कार्यालये, आरबीआय, एलआयसी, जीआयसी, नाबार्ड या सारख्या इतर संस्थांमध्ये पाच दिवसांचा आठवडा सुरु आहे. शेअर बाजार, चलन बाजार आणि विदेशी चलन बाजारात देखील आठवड्यात पाच दिवस काम चालतं, असं म्हटलं.पेन्शनच्या लाभातील सुधारणा, सर्व पेन्शनधारकांना एक समान महागाई भत्ता धोरण, एनपीएसमधील कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेत परतण्याचा पर्याय उपलब्ध करुन द्याव्यात या देखील बँक कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत. वित्त मंत्रालयानं बँक कर्मचाऱ्यांनी संपाचा मार्ग स्वीकारु नये असं म्हटलं आहे. चर्चेतून प्रश्न सोडवण्याचं आवाहन केलं आहे. पीएलआय योजना दीर्घ चर्चेनंतर या महिन्याच्या सुरुवातीलाच मागं घेतली गेली असल्याचं देखील वित्त मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे. गणेशोत्सवातील गर्दी आणि शहबँकांचे व्यवहार करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. देशभरातील बँकांचे कर्मचारी उद्या, 28 सप्टेंबरपासून संपावर जाणार होते. मात्र, हा तीन दिवसांचा संप स्थगित करण्यात आला आहे. संपाच्या केवळ एक दिवस आधी, आयबीए (IBA) आणि बँक कामगार संघटनांची संघटना, यूएफबीयू (UFBU), यांनी रात्री उशिरा एक बैठक घेतली. या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली आणि काही निर्णय घेण्यात आले आहेत. संप स्थगित करण्यात आला आहे.

CJP च्या आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात २ ऑक्टोबरला मुंबईत आंदोलन करण्याच्या तयारीत असलेल्या 'कॉक्रोच जनता पार्टी'ला मोठा धक्का बसला आहे. मुंबई पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. पोलिसांच्या या निर्णयानंतर CJP चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी आक्रमक भूमिका घेतली असून, "नागरिकांचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही," असा इशारा देत गांधी जयंतीच्या दिवशी मुंबईत थेट 'जेल भरो आंदोलन' करण्याची घोषणा केली आहे.अभिजीत दिपके यांनी 'X' (पूर्वीचे ट्विटर) वर पोस्ट करत मुंबई पोलिसांच्या भूमिकेवर टीका केली आहे. मुंबई पोलिसांनी या नकारामागे स्पष्टीकरण देताना नमूद केले की, शिवाजी पार्क येथे कोणत्याही सभा किंवा आंदोलनासाठी परवानगी देण्याचे अधिकार पोलिसांकडे नाहीत. अर्जदार अजिंक्य शिंदे यांना याबाबत पूर्वकल्पना देण्यात आली असून मुंबईत इतर पर्यायी जागा शोधून रीतसर परवानगी मागण्याचा सल्ला देण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.मात्र, पोलिसांच्या या स्पष्टीकरणावर उत्तर देताना दिपके यांनी थेट राजकीय सवाल उपस्थित केला. "जर आम्हाला नियमांचे



कारण दाखवून परवानगी नाकारली जात असेल, तर मग उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यक्रमांना शिवाजी पार्कात परवानगी कशी मिळते?" असा रोखठोक सवाल अभिजीत दिपके यांनी केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. 'द इंडियन एक्सप्रेस'च्या एका बातमीनुसार, निवडणूक आयोगाच्या अंतर्गत कामकाजात आणि निर्णयांमध्ये आयुक्तांमध्ये तीव्र मतभेद आहेत. या अहवालानंतर CJP ने आक्रमक होत ज्ञानेश कुमार यांनी २६ सप्टेंबरपर्यंत राजीनामा न दिल्यास २ ऑक्टोबरला गांधी जयंतीचे औचित्य साधून देशभरात आंदोलनाची हाक दिली होती. मुंबईतून या देशव्यापी आंदोलनाची सुरुवात होणार होती.दरम्यान, निवडणूक आयोगाने आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. "मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षणासह (SIR) सर्व महत्त्वाचे निर्णय संपूर्ण आयोगाने एकमुखाने आणि सर्वसंमतीने घेतले आहेत," असे आयोगाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. संस्थेच्या अंतर्गत विचारमंथनात विविध मते किंवा दृष्टिकोन असणे ही एक स्वाभाविक आणि लोकशाही प्रक्रिया आहे. आयोगाच्या सर्व आदेशांना कायदेशीर मान्यता असून सर्व वैधानिक प्रक्रियांचे काटेकोर पालन केले गेले आहे.

तीन दिवसांचे अधिवेशन बोलवा

मुंबई : राज्य सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. पण, उर्वरीत तालुक्यांतही स्थिती बिकट आहे. त्यामुळे राज्यात सरसकट सर्वच तालुक्यांत दुष्काळ जाहीर करा. दुष्काळाच्या प्रश्नावर तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून, अंमलबजावणीला गती द्या. ष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या राज्य कार्यकारिणीची बैठक आज, सोमवारी मुंबईत होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पवार यांनी आपल्या निवासस्थानी खासदार, आमदार आणि वरिष्ठ पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून आपल्या मागण्या मांडल्या आहेत.

धरणसाठ्याचेपुढीलपावसाळ्या पर्यंतच्या नियोजनाची गरज!

जन सम्राट टाईम्स

राहाता | प्रतिनिधी: राज्यातील धरणांमध्ये उपलब्ध पाणीसाठ्याचे पुढच्या पावसाळ्यापर्यंत नियोजन करावे लागणार आहे. उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून पिण्याच्या पाण्यास प्रथम प्राधान्य आणि त्यानंतर उर्वरित पाणी शेतीसाठी, असा प्राधान्यक्रम राहणार असल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर साध्या पद्धतीने विवाह करावेत, असे आवाहनही मंत्री विखे यांनी केले. लोणीत ते माध्यमांशी बोलत होते. जनावरांच्या चाऱ्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री विखे यांनी सांगितले की, चारा उपलब्ध करून देण्यासाठी डीबीटी यंत्रणेचा वापर करावा. पशुधनाची जनगणना झालेली आहे. लम्पी आजारामध्ये जनावरांच्या लसीकरणाचा विदाही प्रशासनाकडे उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना चाऱ्याचे थेट अनुदान डीबीटीच्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकते. एक नवी यंत्रणा आपल्याकडे उपलब्ध झाली आहे, तिचा उपयोग करून घेतला पाहिजे.

चारा छावण्यांच्या बाबतीत यापूर्वीचा अनुभव चांगला नाही. यापूर्वी अनेक आरोप-प्रत्यारोपही झाले.अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये पुढील तीन महिने चारा पुरेल इतकी उपलब्धता असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत मंत्री विखे हे लोणी येथून सहभागी झाले होते. या बैठकीत मंत्री विखे यांनी राज्यातील वाढत्या वीज टंचाईच्या बाबतीत शासनाने तातडीने व गांभीर्याने



काही ठोस निर्णय घ्यावे लागतील, अशी आग्रही सूचना केली. ग्रामीण भागातील भारनियमनाच्या वाढत्या प्रमाणामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष व संवेदनशील वातावरण निर्माण झाले असल्याकडे त्यांनी महसूल मंत्र्यांचे विशेष लक्ष वेधले.उद्धव ठाकरे यांनी यापूर्वी मराठवाड्यात जाऊन ५० हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांना करण्याच्या वल्गना केल्या होत्या. मात्र, मुख्यमंत्री झाल्यानंतर त्याचा सोयीस्कर विसर त्यांना पडला. एक रुपयाची मदतसुद्धा त्यांनी शेतकऱ्यांना केली नव्हती.लोणी येथे क्रीडा अकादमीची स्थापना करून सर्व खेळाडूंना जागतिक दर्जाच्या प्रशिक्षणाची सुविधा निर्माण करून देणार आहे. या माध्यमातून खेळाडूंना अद्ययावत सुविधा दिल्या जातील. पुरस्कारप्राप्त खेळाडूंना यामध्ये सल्लागार म्हणून नेमणूक करून त्यांचा अनुभव आणि सूचनांमधूनच जिल्ह्याच्या क्रीडा विकासाचा एक नवा अध्याय सुरू केला जाणार असल्याचे मंत्री विखे यांनी सांगितले. त्यांच्या हस्ते पद्मश्री डॉ. विखे पाटील क्रीडारत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले. राज्यातील धरणांमध्ये उपलब्ध पाणीसाठ्याचे पुढच्या पावसाळ्यापर्यंत नियोजन करावे लागणार आहे. उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून पिण्याच्या पाण्यास प्रथम प्राधान्य आणि त्यानंतर उर्वरित पाणी शेतीसाठी, असा प्राधान्यक्रम राहणार असल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

'पाऊस नाही, पाणी नाही... घरात होतं ते दारात टाकलं'; दुष्काळाची व्यथा सांगताना हिला रडल्या

भगतवाडीतील शेतकरी महिलांचा आक्रोश; 'खावं की मुलांना शिकवावं, जनावरं पोसायची कशी?' असा सवाल

जन सम्राट टाईम्स

छत्रपती संभाजीनगर । "पाऊस नाही, पाणी नाही... घरात होतं ते दारात टाकलं. पिकं वाळली आहेत. जनावरांनाही प्यायला पाणी नाही. आता आम्ही काय करायचं?" या शब्दांत दुष्काळाची व्यथा मांडताना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भगतवाडी येथील एका शेतकरी महिलेला अश्रू अनावर झाले. शेतीवर संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असताना पावसाने पाठ फिरवल्याने घरखर्च, मुलांचे शिक्षण, कर्ज आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनल्याचे महिलांनी सांगितले.

महाराष्ट्रात यंदा पावसाच्या कमतरतेमुळे परिस्थिती गंभीर झाली आहे. राज्य सरकारने २६ सप्टेंबर रोजी ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले असून, हा निर्णय राज्याच्या सुमारे ७४ टक्के तालुक्यांना लागू होतो. छत्रपती संभाजीनगर विभागात १ जून ते १८ सप्टेंबर या कालावधीत ४२४.५ मिमी पाऊस झाला, तर या कालावधीतील सामान्य पर्जन्यमान ६१३.१ मिमी होते. त्यामुळे विभागात ३०.८ टक्के पावसाची तूट नोंदली गेली आहे.

'घरातले पैसे शेतीत घातले, आता खायचं काय?'

भगतवाडीतील महिलेने आपली व्यथा सांगताना शेतीसाठी घरातील उपलब्ध पैसे खर्च केल्याचे सांगितले. "जेवढे पैसे होते तेवढे शेतीत घातले. आता तुम्हीच सांगा काय करायचं? आम्ही खावं, मुलांचं शिक्षण करावं की लग्न करावं?" असा सवाल करताना तिच्या



डोळ्यांत अश्रू तरळले.

शेतीचे उत्पादन हातातून गेल्याने कुटुंबाच्या दैनंदिन गरजांसाठीही पैसे उरत नसल्याचे तिने सांगितले. मुलांच्या शाळेचा खर्च, प्रवासाचा खर्च, घरातील किराणा आणि शेतीसाठी घेतलेल्या कर्जाचा भार यामुळे कुटुंबाची आर्थिक कोंडी झाल्याचे महिलांनी मांडले.

"जनावरांना पाणी कसं द्यायचं? त्यांना कसं पोसायचं? आमचं कर्ज कोण फेडणार?" असा सवाल करत शेतकरी कुटुंबांची अवस्था बिकट झाल्याचे त्यांनी सांगितले.

रोजगाराचाही प्रश्न गंभीर

दुष्काळाचा फटका केवळ शेतीपुरता मर्यादित राहिलेला नसून ग्रामीण भागातील रोजगारावरही परिणाम होत असल्याचे महिलांनी सांगितले. कंपन्यांमध्ये काम मिळत नसल्याने शेतीबाहेरील उत्पन्नाचे साधनही उपलब्ध नसल्याची त्यांची तक्रार आहे.

"रात्री झोप येत नाही. चिंता करत करत आजार होण्याची वेळ आली आहे," असे सांगताना संबंधित महिलेने कुटुंबाच्या भवितव्याबाबतची चिंता व्यक्त केली. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसाठी उत्पन्नाचे पर्यायी साधन आणि तातडीची आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी त्यांनी केली.

उपचारासाठीही पैसे नाहीत!

दुष्काळामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाचा परिणाम आरोग्यावरही होत असल्याची व्यथा एका महिलेने मांडली. "दुखणं आलं तर दवाखान्यात द्यायला दहा रुपये नाहीत. कानाने ऐकू येत नाही, डोळ्यांना दिसत नाही; ऑपरेशनसाठी पैसे नाहीत," असे सांगताना ती भावूक झाली. घरातील मुलांचे शिक्षण, मुलींच्या लग्नाचा खर्च आणि वृद्ध दाम्पत्याच्या आरोग्याच्या समस्या यामुळे आर्थिक संकट अधिकच तीव्र झाल्याचे तिने सांगितले.

सरकारकडून मदतीची अपेक्षा

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून तातडीची आर्थिक मदत देण्याची भूमिका मांडली आहे. पीक नुकसानीचे पंचनामे करून मदत देण्याची प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे. मात्र, भगतवाडीतील शेतकरी महिलांच्या डोळ्यांतील अश्रू आणि त्यांच्या प्रश्नांमधून शासकीय मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या हातात कधी पोहोचणार, हा प्रश्न अधोरेखित झाला आहे.

भालगावात राहुल नार्वेकर, गिरीश महाजन यांची शेतभेट

पिकांची स्थिती, पाणीटंचाई व शेतकऱ्यांच्या अडचणींची प्रत्यक्ष पाहणी

जन सम्राट टाईम्स

एरंडोल । प्रतिनिधी : एरंडोल तालुक्यातील मौजे भालगाव येथे दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी शेतभेट देत पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतीसमोरील अडचणी जाणून घेतल्या. संबंधित अधिकाऱ्यांना परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्याचे सांगण्यात आले. यंदा पावसातील अनियमितता आणि पावसाच्या दीर्घ खंडामुळे अनेक भागांतील खरीप पिकांवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर नार्वेकर आणि महाजन यांनी भालगाव परिसरातील शेतशिवारात जाऊन पिकांची सद्यस्थिती, जमिनीतील ओलावा, पाण्याची उपलब्धता आणि शेतीसमोरील अडचणींची पाहणी केली. शेतकऱ्यांनी मांडल्या अडचणी यावेळी शेतकऱ्यांनी पिकांचे नुकसान, सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, पाणीटंचाई तसेच आर्थिक अडचणी याबाबत आपल्या समस्या मांडल्या. नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार आवश्यक मदत मिळावी, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले असून, दुष्काळ व्यवस्थापनातील 'ट्रिगर-१' अंतर्गत विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. पीक नुकसानीचे मूल्यांकन करून पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत. प्रशासनाकडून पाहणीवर भर भालगावातील पाहणीदरम्यान महसूल, कृषी आणि जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांकडून स्थानिक परिस्थितीची माहिती घेण्यात आली. पिकांचे प्रत्यक्ष नुकसान किती आहे, पाण्याची उपलब्धता कशी आहे आणि शेतकऱ्यांना कोणत्या स्वरूपाच्या



उपाययोजनांची आवश्यकता आहे, याचा आढावा घेण्यावर भर देण्यात आला. दुष्काळग्रस्त भागातील पीक नुकसानीचे पंचनामे करताना छायाचित्रे व GPS नोंदणीसह वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्याचे राज्य सरकारने निर्देश दिले आहेत. अधिकारी व शेतकऱ्यांची उपस्थिती यावेळी उपविभागीय अधिकारी मनीषकुमार गायकवाड, तहसीलदार गोपाळ पाटील, मंडळ अधिकारी ठोंबरे, कृषी पर्यवेक्षक सावंत, तलाठी सोनवणे यांच्यासह महसूल, कृषी व जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. दुष्काळी परिस्थितीत प्रत्यक्ष शेतशिवाराची पाहणी झाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी शासन व प्रशासनापर्यंत पोहोचण्यास मदत होईल, अशी अपेक्षा परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली. एरंडोल तालुक्यातील मौजे भालगाव येथे दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी शेतभेट देत पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतीसमोरील अडचणी जाणून घेतल्या. संबंधित अधिकाऱ्यांना परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्याचे सांगण्यात आले. यंदा पावसातील अनियमितता आणि पावसाच्या दीर्घ खंडामुळे अनेक भागांतील खरीप पिकांवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर नार्वेकर आणि महाजन यांनी भालगाव परिसरातील शेतशिवारात जाऊन पिकांची सद्यस्थिती, जमिनीतील ओलावा, पाण्याची उपलब्धता आणि शेतीसमोरील अडचणींची पाहणी केली. शेतकऱ्यांनी मांडल्या अडचणी यावेळी शेतकऱ्यांनी पिकांचे नुकसान, सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, पाणीटंचाई तसेच आर्थिक अडचणी याबाबत आपल्या समस्या मांडल्या. नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार आवश्यक मदत मिळावी, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले असून, दुष्काळ व्यवस्थापनातील 'ट्रिगर-१' अंतर्गत विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात आल्या.

कन्हेरे गावात १० कोटींच्या विकासकामांना सुरुवात!

जन सम्राट टाईम्स

पारोळा । (प्रतिनिधी) : कन्हेरे येथे सुमारे १० कोटी २१ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण दि. २७ सप्टेंबर रोजी आमदार ॲड. अमोल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. माजी आमदार चिमणराव पाटील यांच्या प्रयत्नांतून तसेच आमदार ॲड. अमोल पाटील यांच्या पाठपुराव्याने ही कामे मंजूर झाल्याचे यावेळी सांगण्यात आले. गावातील मूलभूत सुविधा मजबूत करण्याच्या दृष्टीने विविध विकासकामांना यावेळी सुरुवात करण्यात आली.

यामध्ये प्रवाशांच्या सुविधेसाठी १० लाख रुपयांचे पिक-अप शेड, २२ लाख रुपयांचे ग्रामपंचायत कार्यालय, १२ लाख रुपयांचे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या खोलीचे बांधकाम, ११ लाख रुपयांचे अंगणवाडी खोली बांधकाम यांचा समावेश आहे. याशिवाय श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सभागृहासाठी १५ लाख, व्यायामशाळेसाठी १३ लाख, श्रीराम मंदिर सभामंडपासाठी १० लाख आणि स्मशानभूमीच्या बांधकामासाठी १० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. प्रमुख रस्त्यांच्या कामांना मोठी तरतूद कन्हेरे गावाच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे. कन्हेरे-सावखेडा रस्त्याच्या काँक्रीटीकरणासाठी ३ कोटी रुपये, कन्हेरे-लोणी रस्त्याच्या काँक्रीटीकरण व डांबरीकरणासाठी ७५ लाख रुपये, तर कन्हेरे-जळू रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ५ कोटी ४३ लाख रुपये मंजूर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या कामांमुळे गावाला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांच्या दुरुस्ती व मजबुतीकरणाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. एरंडोल-पारोळा विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांसाठी विविध कामांना निधी मंजूर झाल्याचे यापूर्वीही स्थानिक वृत्तांत नमूद करण्यात आले आहे. "मूलभूत सुविधांना प्राधान्य" कार्यक्रमात बोलताना आमदार ॲड. अमोल पाटील यांनी गावाच्या विकासात मूलभूत पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्यात येत असल्याचे सांगितले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

मोंढाळे येथे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी राहुल नार्वेकर, गिरीश महाजन यांचा संवाद

जन सम्राट टाईम्स



पारोळा/सुरेश पाटोळे| प्रतिनिधी : एरंडोल विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी मोंढाळे प्र.अ. येथील शेतशिवाराची पाहणी करून स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांनी पावसाअभावी निर्माण झालेली परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि विविध अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना आमदार ॲड. अमोल पाटील यांनी एरंडोल विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीचा मुद्दा मांडत मोंढाळे प्र.अ. येथे प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधण्याची विनंती केल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर नार्वेकर आणि गिरीश महाजन यांनी मोंढाळे येथे भेट देत शेतशिवाराची पाहणी केली. पिकांची स्थिती जाणून घेतली पाहणीदरम्यान शेतातील पिकांची सद्यस्थिती, पावसातील खंड, पाण्याची उपलब्धता आणि झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी मांडत दुष्काळी परिस्थितीत शासनाकडून आवश्यक मदत आणि सवलती मिळण्याची मागणी केली. राज्यातील २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले असून Trigger-1 अंतर्गत जमीन महसूल सवलत, पीक कर्ज पुनर्रचना, कृषी कर्जवसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या वीजबिलाबाबत सवलती, रोजगार हमीच्या कामांना प्राधान्य तसेच आवश्यक ठिकाणी पाणी व चारा व्यवस्थेसह विविध उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. पीक नुकसानीची प्रत्यक्ष मदत मात्र निर्धारित पाहणी व पंचनाम्याच्या प्रक्रियेनंतर स्वतंत्रपणे निश्चित होणार आहे. शेतकऱ्यांना मदतीची मागणी दुष्काळग्रस्त परिस्थितीत शेतकऱ्यांना शासनाच्या विविध सवलती व मदतीचा लाभ तातडीने मिळावा, तसेच पीक नुकसानीचे पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार मदत मिळावी, अशी मागणी आमदार ॲड. अमोल पाटील यांनी यावेळी केल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने विविध भागांमध्ये प्रत्यक्ष पाहणी, पीक नुकसानीचे मूल्यांकन आणि पंचनाम्यांवर भर दिला आहे. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, माजी नगराध्यक्ष गोविंदआबा शिरोळे, पारोळा तहसीलदार डॉ. उल्हास देवरे, शिवसेना शहरप्रमुख, गटनेते तथा नगरसेवक अमृतभाऊ चौधरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनीषभाऊ पाटील, शिवसेना उपगटनेते तथा नगरसेवक पंकजभाऊ मराठे, भाजपा तालुकाध्यक्ष अतुलअण्णा पवार, गिरडचे माजी सरपंच संजय पाटील, पिंपळगावचे सरपंच जयराम पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, शेतकरी, स्थानिक नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते.

मध्य विधानसभा मतदारसंघात आजाद समाज पार्टीत कार्यकर्त्यांचा प्रवेश!

जन सम्राट टाईम्स



छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी: आजाद समाज पार्टी (कांशीराम) मध्ये छत्रपती संभाजीनगर मध्य व पश्चिम विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार ॲड. चंद्रशेखर आजाद यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मनीष साठे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रभारी अरविंद कांबळे तसेच जिल्हाध्यक्ष विजय शिनगारे यांच्या नेतृत्वाखाली मध्य विधानसभा मतदारसंघात हा प्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी नव्याने पक्षात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांपैकी विविध जाहीर करण्यात आल्या.

संघटन विस्तारावर भर कार्यक्रमाला प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रभारी अरविंद कांबळे, मराठवाडा कार्याध्यक्ष तातेराव ससाणे, जिल्हा प्रभारी राहुल साबळे, जिल्हाध्यक्ष विजय शिनगारे, युवा जिल्हाध्यक्ष अनामि मोरे, शहर अध्यक्ष शेख जावेद, अल्पसंख्याक आघाडीचे शहराध्यक्ष शेख अजहर, शहर सचिव अमोल सोनवणे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना अरविंद कांबळे यांनी छत्रपती संभाजीनगर शहरात सर्वसामान्य, वंचित, दलित आणि मुस्लिम समाजातील नागरिकांमध्ये पक्षाबाबतचा सहभाग वाढत असल्याचा दावा केला. आगामी काळात शहर व विधानसभा मतदारसंघातील पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले. आजाद समाज पार्टीने महाराष्ट्रात संघटनात्मक विस्तारासाठी विविध पदांवर नियुक्त्या करण्याचा क्रम सुरू ठेवला आहे.आजाद समाज पार्टी (कांशीराम) मध्ये छत्रपती संभाजीनगर मध्य व पश्चिम विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार ॲड. चंद्रशेखर आजाद यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मनीष साठे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रभारी अरविंद कांबळे तसेच जिल्हाध्यक्ष विजय शिनगारे यांच्या नेतृत्वाखाली मध्य विधानसभा मतदारसंघात हा प्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला होता.

पिंपरखेड प्राथमिक आरोग्य केंद्राची NQAS अंतर्गत राज्यस्तरीय पाहणी

सेवा आणि विविध विभागांच्या कामकाजाची बारकाईने तपासणी

जन सम्राट टाईम्स



भडगाव। प्रतिनिधी: राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके (NQAS) अंतर्गत भडगाव तालुक्यातील पिंपरखेड प्राथमिक आरोग्य केंद्राची राज्यस्तरीय पाहणी नुकतीच करण्यात आली. राज्यस्तरीय तपासणी पथकाने सकाळी ९ वाजता आरोग्य केंद्राला भेट देऊन विविध विभागांच्या कामकाजाची सविस्तर पाहणी केली. राज्यस्तरीय पथकात डॉ. शैलेश पाटील व डॉ. किरण पाटील यांचा समावेश होता. पथकाचे आरोग्य केंद्रात रांगोळी काढून तसेच केंद्रातील गटप्रवर्तक आणि आशा स्वयंसेविकांनी 'आशा परसबाग' ही संकल्पना राबवून स्वागत केले. यानंतर तपासणी पथकाने प्राथमिक आरोग्य केंद्रातील विविध विभागांची बारकाईने पाहणी केली. यामध्ये बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), प्रसूती कक्ष (लेबर रूम), प्रयोगशाळा, औषध भांडार, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, संसर्ग नियंत्रण, रुग्णांचे हक्क तसेच विविध नोंदवह्यांची तपासणी करण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या मेहनतीला आले यश NQAS अंतर्गत निर्धारित गुणवत्ता मानके पूर्ण करण्यासाठी पिंपरखेड प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गेल्या काही महिन्यांपासून विशेष परिश्रम घेतले आहेत. आरोग्य केंद्र अधिक स्वच्छ, सुंदर, शिस्तबद्ध आणि रुग्णाभिमुख करण्यावर विशेष भर देण्यात आला. पाहणीदरम्यान केंद्रातील विविध विभाग, सेवा व्यवस्था आणि नोंदवहींची तपासणी केल्यानंतर राज्यस्तरीय पथकाने आरोग्य केंद्राच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी भडगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. समाधान वाघ, पिंपरखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक भोसले यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी, सर्व गटप्रवर्तक आणि आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके (NQAS) अंतर्गत भडगाव तालुक्यातील पिंपरखेड प्राथमिक आरोग्य केंद्राची राज्यस्तरीय पाहणी नुकतीच करण्यात आली. राज्यस्तरीय तपासणी पथकाने सकाळी ९ वाजता आरोग्य केंद्राला भेट देऊन विविध विभागांच्या कामकाजाची सविस्तर पाहणी केली. राज्यस्तरीय पथकात डॉ. शैलेश पाटील व डॉ. किरण पाटील यांचा समावेश होता. पथकाचे आरोग्य केंद्रात रांगोळी काढून तसेच केंद्रातील गटप्रवर्तक आणि आशा स्वयंसेविकांनी 'आशा परसबाग' ही संकल्पना राबवून स्वागत केले.


धुळ्यात दोन गटांत वाद; चार राऊंड फायरिंग अन् शस्त्रांचा धाक आग्रा रोडवरील मनोहर चित्रपटगृहासमोर थरार!

जन सम्राट टाईम्स



धुळे। प्रतिनिधी: धुळे शहरातील आग्रा रोडवरील मनोहर चित्रपटगृहासमोर दोन गटांत झालेल्या वादाला हिंसक वळण लागल्याची घटना समोर आली आहे. या वादादरम्यान चार राऊंड फायरिंग झाल्याचा दावा असून, काही तरुणांनी शस्त्रे बाहेर काढल्याने परिसरात खळबळ उडाली. संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आग्रा रोडवरील एका व्यावसायिक ठिकाणी हर्षल दीपक गवळी आणि त्याचा भाऊ राज दीपक गवळी यांच्यावर काही तरुणांनी हल्ला केल्याची माहिती आहे. या हल्ल्यात हर्षल गवळी किरकोळ जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणात गोलू मेकले आणि भावेश किर्लोस्कर यांच्यासह चार ते पाच तरुणांचा सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हल्लेखोरांनी चार राऊंड फायर केल्याचा दावा असून, त्यानंतर शस्त्रे दाखवत घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती आहे. घटनास्थळावरून गोळीबाराचे अवशेष जप्त गोळीबार झालेल्या ठिकाणी पोलिसांना बंदुकीच्या गोळ्यांचे अवशेष आढळून आले.

जेतवन बुद्ध विहारात वर्षावास प्रवचन मालिकेचे तेरावे पुष्प संपन्न



जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी: भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व अंतर्गत जळगाव तालुक्याच्या वतीने आयोजित राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे तेरावे पुष्प जळगाव येथील अजिंठा हौसिंग सोसायटी परिसरातील जेतवन बुद्ध विहारात उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरणात संपन्न झाले. यावेळी आयु. रविंद्र एन. वानखेडे गुरुजी (केंद्रीय शिक्षक तथा जिल्हा उपाध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व) यांनी 'चार ब्रह्मविहार' या विषयावर उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या चार ब्रह्मविहारांचे महत्त्व स्पष्ट केले.

दैनंदिन जीवनातील विविध उदाहरणांच्या माध्यमातून या चारही भावनांचा मानवी जीवनाशी असलेला संबंध त्यांनी उलगडून सांगितला. मैत्रीभाव, करुणा, दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानण्याची वृत्ती आणि समत्वभाव यांचा जीवनात अंगीकार केल्यास व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होण्यास मदत होते, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाला मार्गदर्शक गुरुवर्य आद. बी. एस. पवार गुरुजी (जिल्हा संघटक) यांच्यासह आयु. आर. एम. सूर्यवंशी (माजी तालुकाध्यक्ष, मलकापूर), आयु. खराटे (बौद्धाचार्य, नांदुरा), आयु. बाबुराव वाघ, आयु. तासखेडकर, आयु. अशोक सैंदाणे, तसेच आद. ज्योतीताई भालेराव (केंद्रीय शिक्षिका) आणि आद. सुषमाताई इंगळे (जिल्हा कार्यकारिणी सचिव) आदी मान्यवर उपस्थित होते.

याशिवाय परिसरातील मोठ्या संख्येने श्रद्धाशील व धम्मनिष्ठ बौद्ध उपासक-उपासिका कार्यक्रमाला उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. राजेश इंगळे यांनी केले.

तर आद. ज्योतीताई भालेराव यांनी उपस्थितांचे आभार मानले. या मंगल प्रसंगी उपस्थित उपासक-उपासिकांसाठी सुजाता महिला संघाच्या वतीने खीरदान करण्यात आले.

त्यामुळे कार्यक्रमाला सामाजिक व बंधुभावाचा विशेष स्पर्श लाभला. राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेतील तेरावे पुष्प जेतवन बुद्ध विहारात उत्साहात संपन्न झाल्याने परिसरात धम्ममय वातावरण निर्माण झाले होते.

माळेगाव शिवारात रानडुकरांचा धुमाकूळ; अडीच एकर मका पिकाचे नुकसान

रात्रीच्या वेळी कळपाने शेतात घुसून मक्याची कणसे खाल्ली, पिके तुडवली!

जन सम्राट टाईम्स

माळेगाव । प्रतिनिधी : सोयगाव तालुक्यातील माळेगाव शिवारातील गट क्रमांक ३९ मध्ये रानडुकरांनी धुमाकूळ घालत मका पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याची घटना समोर आली आहे. शेतकरी भिकाबाई दगडू जाधव यांच्या अडीच एकर क्षेत्रातील मका पिकाचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास रानडुकरांचा कळप शेतात घुसला. रानडुकरांनी मक्याची कणसे खाण्यासह उभे पीक पायाखाली तुडवून टाकल्याने संपूर्ण शेताचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अडीच एकर क्षेत्रातील पिकाचे शंभर टक्के नुकसान झाल्याचा अंदाज असून, लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.अतिपावसाच्या संकटात वन्यप्राण्यांचा उपद्रव यंदा तुटपुंज्या आणि अनियमित पावसामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम झाला आहे. काही ठिकाणी पिके आडवी होऊन कुजण्याची भीती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत रानडुकरांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांसमोर आणखी एक संकट



उभे राहिले आहे.माळेगाव परिसरात रानडुकरांचा वावर वाढल्याने पिकांचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. रात्रीच्या वेळी शेतात जाणेही शेतकऱ्यांसाठी धोकादायक ठरत असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे.वन विभागाकडे पंचनाम्याची मागणी या घटनेची तातडीने दखल घेऊन वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी करावी, नुकसानभरपाई शेतकरी भिकाबाई दगडू जाधव यांना मिळवून द्यावी, अशी मागणी माळेगाव परिसरातील शेतकरी व नागरिकांनी केली आहे. वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठीही वन विभागाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. या प्रकरणी तातडीने दखल न घेतल्यास शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही स्थानिक शेतकऱ्यांनी दिला आहे.सोयगाव तालुक्यातील माळेगाव शिवारातील गट क्रमांक ३९ मध्ये रानडुकरांनी धुमाकूळ घालत मका पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याची घटना समोर आली आहे. शेतकरी भिकाबाई दगडू जाधव यांच्या अडीच एकर क्षेत्रातील मका पिकाचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास रानडुकरांचा कळप शेतात घुसला. रानडुकरांनी मक्याची कणसे खाण्यासह उभे पीक पायाखाली तुडवून टाकल्याने संपूर्ण शेताचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अडीच एकर क्षेत्रातील पिकाचे शंभर टक्के नुकसान झाल्याचा अंदाज असून, लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.अतिपावसाच्या संकटात वन्यप्राण्यांचा उपद्रव यंदा तुटपुंज्या आणि अनियमित पावसामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम झाला आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

महावितरणच्या तांत्रिक कामांत अनधिकृत व्यक्तींना बंदी!

नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाईचे निर्देश; खासगी व्यक्तींकडून धोकादायक विद्युत कामे करून घेण्यास मनाई

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: महावितरण च्या तांत्रिक कामांमध्ये अनधिकृत अथवा खासगी व्यक्तींचा वापर करण्यास प्रतिबंध घालण्याबाबत २४ सप्टेंबर २०२६ रोजी परिपत्रक जारी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. ग्राहक तसेच विद्युत कामांमध्ये सहभागी कर्मचाऱ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन तांत्रिक कामे अधिकृत व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडूनच करून घेण्यावर भर देण्यात आल्याचे या परिपत्रकात नमूद असल्याचे सांगण्यात येत आहे. महावितरणच्या विविध कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात रोहित्र बदलणे, डीओ फ्यूज बसवणे, उच्च व लघुदाब वाहिन्यांवरील कामे, वाहिनीतील बिघाड दुरुस्त करणे, मीटर काढणे अथवा बसवणे यांसारखी विद्युत कामे केली जातात. अशा धोकादायक कामांसाठी अनधिकृत व्यक्तींचा वापर केल्यास सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. अनधिकृत व्यक्तींकडून काम करून घेण्यास मनाई परिपत्रकानुसार, महावितरणच्या तांत्रिक कामांसाठी कोणत्याही अनधिकृत अथवा खासगी व्यक्तीची मदत घेऊ नये, असे निर्देश देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. तांत्रिक स्वरूपाची कामे अधिकृत, प्रशिक्षित आणि आवश्यक पात्रता असलेल्या कर्मचाऱ्यांकडूनच करून घेण्यावर भर देण्यात आला आहे. महावितरणच्या संकेतस्थळावरही अनधिकृत व्यक्तींकडून विद्युत वायरिंगची कामे करून घेऊ नयेत, असा ग्राहक सुरक्षेशी संबंधित इशारा देण्यात आला आहे. नियमभंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, क्षेत्रीय स्तरावर एखादा अधिकारी किंवा कर्मचारी अनधिकृत व्यक्तीकडून तांत्रिक काम करून घेताना आढळल्यास त्याची गंभीरपणे दखल घेण्यात येणार आहे. अशा प्रकाराला गंभीर गैरवर्तन मानून संबंधित कर्मचाऱ्यावर विभागीय चौकशीसह कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच, संबंधित उपविभागात अशा प्रकारची घटना घडल्यास उपकार्यकारी अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या जबाबदारीचाही विचार करण्यात येणार असल्याचे परिपत्रकात नमूद आहे. अपघात झाल्यास जबाबदारीचा प्रश्न गंभीर अनधिकृत व्यक्तीकडून विद्युत काम करून घेताना अपघात अथवा जीवितहानी झाल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित होण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. विद्युत सुरक्षेबाबत केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (CEA) स्वतंत्र सुरक्षा नियमावली जारी केली आहे. सध्या CEA च्या संकेतस्थळावर Central Electricity Authority (Measures relating to Safety and Electric Supply) Regulations, 2023 उपलब्ध आहेत.

